पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ 208 /२०२४ दि. 22 /१०/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ठाणेनगर वाहतूक उपविभागाचे हद्दीत **विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४** चे अनुषंगाने दि. २२/१०/२०२४ रोजी ते दि. ०४/११/२०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचे अनुषंगाने विविध पक्षाचे उमेदवार नामनिर्देषन पत्र दाखल करणे व उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रकिया पार पडणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) जी.पी.ओ. कडून कोर्टनाका मार्गे ठाणे रेल्वे स्टेशन कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जी.पी.ओ** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने ठाणे मध्यवर्ती कारागृहकडून क्रिकनाका मार्गे दादोजी कोंडदेव स्टेडीयम येथून उजवे वळण घेवून ए वन फर्निचर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) सिव्हील हॉस्पिटल कॉर्नर व चरईकडून टेंभीनाका मार्गे टॉवर नाका कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **श्री भवानी चौक टेंभीनाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने टेंभीनाका येथून सरळ कोर्टनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) टेंभी नाका कडून कोर्टनाका सर्कल कडून आनंद आश्रम मार्गे टॉवर नाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून डावे वळण घेवून जांभळी नाका, मुख्य बाजारपेठ मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) कळवा नाका कडून क्रिक नाका मार्गे कोर्टनाका कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **उर्जिता हॉटेलसमोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने उर्जिता हॉटेल येथून उजवे वळण घेवून मध्यवर्ती कारागृह समोरून जी.पी.ओ. मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) पारेख ट्रान्सपोर्ट, महागिरी व खारकर आळी मार्गे टॉवर नाका कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जांभळी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने जांभळी नाका येथून डावे वळण घेवून मुख्य बाजारपेठ मधून एवन फर्निचर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ६) ठाणे रेल्वे स्टेशन कडून टॉवर नाका/टेंभीनाका कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या/टी.एम.टी. बसेस, रिक्षा व चार चाकी लहान वाहनांना **मुसा चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने ठाणे रेल्वे स्टेशन कडून सॅटीस ब्रिजवरून येणाऱ्या परिवहनाच्या सर्व एस.टी./टी.एम.टी. बसेस बी केबिन सॅटीस ब्रिजवरून गोखले रोड मार्गे इच्छित स्थळी जातील. तसेच रिक्षा व चार चाकी लहान वाहने सॅटीस ब्रिजखालून मुसा रोड चौक मार्गे डावे वळण घेवून इच्छित स्थळी जातील.

**नो पार्किंग –** कोर्टनाका ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, उर्जिता हॉटेल ते जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे पोलीस स्कूल ते शासकीय विश्रामगृह, श्री भवानी चौक, टेंभीनाका ते कोर्टनाका व कोर्ट परिसर येथे रस्त्याचे दोन्ही बाजूस कोणतेही वाहन पार्क करण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदर अधिसूचना दि. २२/१०/२०२४ ते दि. २९/१०/२०२४ रोजी सायंकाळी १८:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

CamScanner

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
ठाणे पोलीस पत्रक

**प्रत** :– नगर अभियंता, ठा. म. पा. ठाणे.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.**

स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग, सबंधित पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

CS CamScanner

# THANENAGAR TRAFFIC UNIT




CamScanner